प्रेस नोट दि. ०७/०८/२०१९

## सोलापूर ग्रामीण पोलीस दल

## पुर परिस्थितीमुळे वाहतुक मार्ग बंद केलेबाबत

oooooo

यात निवेदन असे की, सध्या पुणे जिल्हयातुन सर्व धरणातुन मोठया प्रमाणावर पाणी उजनी धरणात येत असल्याने व सध्या उजनी धरण १०० टक्के भरले असल्याने मागील ०२ दिवसापासून उजनी धरणातुन मोठया प्रमाणात पाणी भिमा नदी पात्रात सोडल्याने सोलापूर जिल्हयातील खालील प्रमुख राष्ट्रीय व राज्य मार्गावरील व पंढरपूर शहराला जोडणा-या सर्व रोडवरील पुल सध्या पाण्याखाली गेले आहेत,

१) सोलापूर-मंगळवेढा रोडवरील बेगमपूर जवळील पुल

२) टेंभुर्णी-अकलुज रोडवरील संगम जवळील पुल

३) पंढरपूर शहरातील ६५ एकर जवळील नवीन पुल व बायपास रोडवरील अहिल्यादेवी चौकाकडुन जाणा-या रस्त्यावरील पुल पाण्याखाली गेल्याने मोहोळ ते पंढरपूर, शेटफळ-पंढरपूर, टेंभुर्णी ते पंढरपूर या मार्गावरील वाहतुक सध्या पुर्णपुणे बंद करण्यात आली आहे.

तरी प्रवाशांनी व नागरिकांनी वर नमुद केलेल्या मार्गावरून वाहतुक करू नये, पर्यायी मार्गाचा वापर करावा वरील आदेशाचे नागरिक व वाहनधारकांनी काटेकोरपणे पालन करावे, कोणीही वाहनचालक व गावातील नागरिक पुलावरून अथवा पुलाजवळ जाणार नाहीत, असे सोलापूर ग्रामीण पोलीस दलाकडुन आवाहन करण्यात येत आहे.

**टीपः- पाण्याची पातळी कमी झालेनंतर सदर मार्गावरील वाहतुक व्यवस्था पुर्ववत चालु करण्यात येईल**

प्रती,

मा.संपादक ..........

तरी सदर बातमी आपले लोकप्रिय दैनिक वर्तमान पत्रातून प्रसिध्द होणेस विनंती आहे.